Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843
दैनिक
सत्याचे प्राईम्स
# जन सम्राट टाईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे
। बुधवार, दि. २२ जूलै २०२६ । वर्ष १ ।अंक १०४ ।पाने २ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306
DIGITAL EDITION

राष्ट्रीय मुस्लिम मोर्चाचे जळगाव जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे (पान २ वर)



## जंतर-मंतरवरील आंदोलनाला राहुल-प्रियंका गांधींचा पाठिंबा; अभिजित दीपकेंची भेट घेणार

# राहुल- प्रियंकांचा नरेंद्र मोदींच्या घरासमोर ठिय्या!

## केंद्रीय शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी विरोधक आक्रमक

जन सम्राट टाईम्स

**नवी दिल्ली । देशभरातील विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवरून दिल्लीतील जंतर-मंतर येथे सुरू असलेल्या सीजेपीच्या आंदोलनाने आता राष्ट्रीय राजकारणाचे केंद्रस्थान गाठले आहे.**

केंद्रीय शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी सुरू असलेल्या या आंदोलनाला विरोधी पक्षांनी उघड पाठिंबा दिला असून, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, काँग्रेसच्या खासदार प्रियंका गांधी आणि इंडिया आघाडीतील अनेक वरिष्ठ नेते आंदोलकांची भेट घेण्यासाठी जंतर-मंतरकडे रवाना झाले. या दरम्यान त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अधिकृत निवासस्थानाबाहेर ठिय्या आंदोलन करत केंद्र सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली.दिल्लीतील जंतर-मंतर येथे गेल्या अनेक दिवसांपासून विद्यार्थ्यांच्या विविध मागण्यांसाठी आंदोलन सुरू आहे. शिक्षण व्यवस्थेतील कथित गैरप्रकार, परीक्षा प्रक्रियेतील अनियमितता आणि विद्यार्थ्यांवरील



पोलिसी कारवाईच्या निषेधार्थ देशभरातून हजारो विद्यार्थी या आंदोलनात सहभागी झाले आहेत. "जोपर्यंत केंद्रीय शिक्षणमंत्री पदाचा राजीनामा देत नाहीत, तोपर्यंत आंदोलन मागे घेतले जाणार नाही," अशी स्पष्ट भूमिका सीजेपीचे संस्थापक अभिजित दीपके यांनी घेतली आहे. या आंदोलनाचे पडसाद थेट संसदेतही उमटले. पावसाळी अधिवेशनादरम्यान विरोधी पक्षांनी विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित लाठीहल्ल्याचा मुद्दा जोरदारपणे उपस्थित केला. सरकारविरोधात घोषणाबाजी करत विरोधकांनी सभागृहात गदारोळ घातल्याने संसदेचे कामकाज काही काळासाठी तहकूब करावे लागले. दरम्यान, आंदोलनाला पाठिंबा दर्शवण्यासाठी राहुल गांधी, प्रियंका गांधी यांच्यासह काँग्रेस आणि इतर विरोधी पक्षांचे अनेक खासदार जंतर-मंतरच्या दिशेने निघाले. मार्गात त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निवासस्थानासमोर ठिय्या आंदोलन केले. यावेळी केंद्र सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या मागण्यांकडे सरकारने तातडीने लक्ष द्यावे आणि केंद्रीय शिक्षणमंत्र्यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा, अशी मागणी विरोधकांनी केली. विरोधी पक्षाच्या नेत्यांच्या या आक्रमक भूमिकेनंतर दिल्ली पोलिस आणि सुरक्षा यंत्रणा अधिक सतर्क झाली. मोदी निवासस्थान परिसरात सुरक्षा व्यवस्था वाढवण्यात आली.

### दीपके यांच्या प्रकृतीची विचारपूस

पोलिसांच्या या कारवाईवर विरोधकांनी तीव्र नाराजी व्यक्त करत "लोकशाहीमध्ये आंदोलनाचा अधिकार हिरावला जात आहे," असा आरोप केला. दुसरीकडे, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी जंतर-मंतर येथे जाऊन आंदोलनकर्ते अभिजित दीपके यांची भेट घेतली. दीपके यांच्या प्रकृतीची विचारपूस करत त्यांनी आंदोलनाची सविस्तर माहिती जाणून घेतली. विद्यार्थ्यांना आवश्यक ती मदत करण्याबाबतही दोघांमध्ये चर्चा झाल्याची माहिती सूत्रांनी दिली. जंतर-मंतरवरील आंदोलनाला दिवसेंदिवस विविध सामाजिक संघटना, विद्यार्थी संघटना आणि राजकीय पक्षांचा पाठिंबा वाढत असल्याने दिल्लीतील राजकीय वातावरण अधिकच तापले आहे. सरकार या आंदोलनावर काय भूमिका घेते आणि विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर कोणता निर्णय घेतला जातो, याकडे आता संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे.

---

Selected

### आदिवासींच्या प्रश्नांवर २४ जुलैला जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक

**जळगाव :** जळगाव जिल्ह्यातील आदिवासी समाजाच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर चर्चा करून त्यावर तोडगा काढण्यासाठी २४ जुलै रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक आयोजित करण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे. प्रसिद्धीपत्रकानुसार, पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी जिल्हाधिकाऱ्यांना या बैठकीचे निर्देश दिले असून, विविध शासकीय विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित राहावेत, यासाठी एटीएस (ATS) च्या वतीनेही संबंधित विभागांना निवेदन देण्यात आले आहे. बैठकीत आदिवासी समाजाच्या विविध समस्या मांडून त्यावर चर्चा होणार असल्याने समाजातील जाणकार, सामाजिक कार्यकर्ते आणि प्रतिनिधींनी उपस्थित राहून आदिवासी बांधवांच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी सहकार्य करावे, असे आवाहन कार्यकर्ते पंढरीनाथ मोरे यांनी केले आहे.

---

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

## भारताला झिम्बाब्वेचा इशारा! मालिका एकतर्फी होणार नाही

### झिम्बाब्वेच्या कर्णधाराचा आत्मविश्वास

जन सम्राट टाईम्स

**नवी दिल्ली | प्रतिनिधी:** इंग्लंड आणि आयर्लंडविरुद्धच्या टी-20 मालिकेनंतर आता भारतीय क्रिकेट संघ झिम्बाब्वे दौऱ्यावर सज्ज झाला आहे. या मालिकेच्या प्रारंभापूर्वीच झिम्बाब्वेचा कर्णधार सिकंदर रझा याने भारतीय संघाला आत्मविश्वासपूर्ण इशारा दिला आहे. सिकंदर रझाने म्हटले की, भारताविरुद्धची ही मालिका कोणत्याही परिस्थितीत एकतर्फी होणार नाही. दोन्ही संघांकडे विजयाची समान संधी असून, झिम्बाब्वेचा संघ दमदार कामगिरी करण्यास सक्षम असल्याचा विश्वास त्याने व्यक्त केला. रझा म्हणाला, "या मालिकेत दोन्ही देशांकडे विजयासाठी समान संधी आहेत. आमच्या संघावर आम्हाला पूर्ण विश्वास आहे. गेल्या काही काळात आम्ही सातत्यपूर्ण कामगिरी केली आहे. त्यामुळे ही मालिका अत्यंत रोमांचक आणि चुरशीची होईल, असा मला विश्वास आहे." भारताचा संघ तुलनेने अधिक अनुभवी आणि बलाढ्य मानला जात असला तरी घरच्या मैदानावरील परिस्थितीचा फायदा घेत झिम्बाब्वे




भारतीय संघाला कडवी झुंज देण्याच्या तयारीत आहे. त्यामुळे क्रिकेटप्रेमींचे लक्ष या मालिकेकडे लागले आहे.सिकंदर रझाने म्हटले की, भारताविरुद्धची ही मालिका कोणत्याही परिस्थितीत एकतर्फी होणार नाही. भारताचा संघ तुलनेने अधिक अनुभवी आणि बलाढ्य मानला जात असला तरी घरच्या मैदानावरील परिस्थितीचा फायदा घेत झिम्बाब्वे भारतीय संघाला कडवी झुंज देण्याच्या तयारीत आहे.दोन्ही संघांकडे विजयाची समान संधी असून, झिम्बाब्वेचा संघ दमदार कामगिरी करण्यास सक्षम असल्याचा विश्वास त्याने व्यक्त केला. रझा म्हणाला, "या मालिकेत दोन्ही देशांकडे विजयासाठी समान संधी आहेत. आमच्या संघावर आम्हाला पूर्ण विश्वास आहे. गेल्या काही काळात आम्ही सातत्यपूर्ण कामगिरी केली आहे. त्यामुळे ही मालिका अत्यंत रोमांचक आणि चुरशीची होईल, असा मला विश्वास आहे."

---

## मनुदेवी देवस्थान परिसरात एफडीएची कारवाई; प्रसादाच्या गुणवत्तेची होणार तपासणी

### भाविकांच्या आरोग्याच्या सुरक्षेसाठी विशेष मोहीम; व्यापाऱ्यांना स्वच्छतेच्या कडक सूचना

जन सम्राट टाईम्स

**यावल | प्रतिनिधी :** खानदेशातील प्रसिद्ध कुलदैवत श्री क्षेत्र मनुदेवी (आडगाव, ता. यावल) येथे येणाऱ्या हजारो भाविकांच्या आरोग्याच्या सुरक्षेला प्राधान्य देत अन्न व औषध प्रशासन (एफडीए) विभागाने मंदिर परिसरातील प्रसाद विक्री करणाऱ्या दुकानांवर धडक तपासणी मोहीम राबविली.

या कारवाईत विविध प्रकारच्या प्रसादाचे नमुने संकलित करून पुढील तपासणीसाठी शासकीय प्रयोगशाळेत पाठविण्यात आले. एफडीएच्या पथकाने मंदिर परिसरातील अनेक दुकानांची पाहणी करत पेढा, बर्फी, लाडू तसेच इतर गोड पदार्थांचे नमुने नियमांनुसार सील करून जप्त केले. हे नमुने रासायनिक आणि सूक्ष्मजैविक तपासणीसाठी पाठविण्यात आले असून, अहवालानुसार पुढील कारवाई करण्यात येणार आहे. स्वच्छता आणि अन्न सुरक्षेवर भर तपासणीदरम्यान अधिकाऱ्यांनी




दुकानदारांना अन्नपदार्थ स्वच्छ आणि झाकून ठेवणे, मुदतबाह्य खाद्यपदार्थ विक्रीस न ठेवणे, स्वच्छ पाणी वापरणे तसेच एफएसएसएआय (FSSAI) च्या नियमांचे काटेकोर पालन करण्याच्या सूचना दिल्या. खाद्यपदार्थांच्या साठवणुकीपासून विक्रीपर्यंत प्रत्येक टप्प्यावर स्वच्छतेचे निकष पाळण्याचे आवाहनही करण्यात आले. अहवालानंतर होणार पुढील कारवाई प्रयोगशाळेचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर संबंधित नमुने निकृष्ट दर्जाचे किंवा भेसळयुक्त आढळल्यास संबंधित विक्रेत्यांवर अन्न सुरक्षा व मानके कायदा अंतर्गत कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. भाविकांच्या आरोग्यासाठी नियमित तपासण्या आवश्यक मनुदेवी हे उत्तर महाराष्ट्रातील प्रमुख श्रद्धास्थान असल्याने वर्षभर मोठ्या संख्येने भाविक येथे दर्शनासाठी येतात. त्यामुळे प्रसाद आणि खाद्यपदार्थांची गुणवत्ता कायम राखण्यासाठी अशा तपासणी मोहिमा नियमितपणे राबविणे आवश्यक असल्याचे मत नागरिकांनी व्यक्त केले. अचानक झालेल्या या कारवाईमुळे मंदिर परिसरातील व्यापाऱ्यांमध्ये काही काळ खळबळ उडाली. मात्र, भाविकांच्या आरोग्याच्या दृष्टीने प्रशासनाने घेतलेल्या या भूमिकेचे सर्व स्तरातून स्वागत करण्यात येत आहे.

---

## शिरपूरात कपड्याच्या दुकानाला भीषण आग

### अग्निशामक दलाच्या अथक प्रयत्नांनी आग आटोक्यात

जन सम्राट टाईम्स

**शिरपूर (धुळे) | प्रतिनिधी :** शिरपूर शहरातील मध्यवर्ती भागातील गुजराती कॉम्प्लेक्समधील एका कपड्याच्या दुकानाला रविवारी रात्री भीषण आग लागून लाखो रुपयांचे नुकसान झाल्याची घटना घडली. या आगीत कपड्यांसह शेतीसाठी वापरण्यात येणारे साहित्यही जळून खाक झाले. माहितीनुसार, रात्रीच्या सुमारास दुकानातून अचानक धूर आणि आगीच्या ज्वाळा दिसू लागल्यानंतर परिसरात एकच खळबळ उडाली. नागरिकांनी तात्काळ शिरपूर



अग्निशामक दलाला माहिती दिली. माहिती मिळताच अग्निशामक दल घटनास्थळी दाखल झाले आणि अथक प्रयत्नांनंतर आगीवर नियंत्रण मिळवले. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी मोठ्या प्रमाणात वित्तहानी झाली आहे. आगीमुळे दुकानातील कपडे आणि इतर साहित्य पूर्णपणे जळून खाक झाल्याचे सांगण्यात आले. आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून संबंधित यंत्रणांकडून तपास सुरू आहे. या आगीत कपड्यांसह शेतीसाठी वापरण्यात येणारे साहित्यही जळून खाक झाले. माहितीनुसार, रात्रीच्या सुमारास दुकानातून अचानक धूर आणि आगीच्या ज्वाळा दिसू लागल्यानंतर परिसरात एकच खळबळ उडाली.

---

## सह-दुय्यम निबंधक कार्यालयाच्या नव्या सुसज्ज इमारतीचे लोकार्पण

### संजय सावकारे यांच्या हस्ते उद्घाटन



जन सम्राट टाईम्स

**भुसावळ | प्रतिनिधी :** भुसावळ येथील तहसील कार्यालय परिसरात उभारण्यात आलेल्या सह-दुय्यम निबंधक कार्यालयाच्या नव्या प्रशस्त व सुसज्ज इमारतीचे लोकार्पण राज्याचे वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांच्या हस्ते करण्यात आले. या आधुनिक इमारतीमुळे दस्त नोंदणीसह विविध शासकीय सेवा अधिक जलद, पारदर्शक आणि नागरिकाभिमुख पद्धतीने उपलब्ध होतील, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

लोकार्पण सोहळ्यास उपविभागीय अधिकारी जितेंद्र पाटील, तहसीलदार नीता लबडे, प्रभारी नगराध्यक्षा शैलजा नारखेडे, मंदार पाठक, सह-दुय्यम निबंधक नितीन सोनवणे, नगरपालिकेचे नगरसेवक, विविध विभागांचे अधिकारी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मंत्री संजय सावकारे यांनी नव्या इमारतीची पाहणी करून उपलब्ध कार्यालयीन सुविधांचा आढावा घेतला. नागरिकांना दस्त नोंदणीसाठी अधिक सुलभ, सुरक्षित आणि कार्यक्षम सेवा देण्यासाठी आधुनिक पायाभूत सुविधा आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

नव्या इमारतीमुळे नागरिकांचा वेळ वाचेल, कार्यालयीन कामकाजात गती येईल आणि सेवा वितरण अधिक परिणामकारक होईल, असेही त्यांनी नमूद केले. उपस्थित मान्यवरांनीही नव्या इमारतीमुळे दस्त नोंदणीसाठी येणाऱ्या नागरिकांची गैरसोय दूर होऊन कार्यालयीन कामकाज अधिक गतिमान होईल, असा विश्वास व्यक्त केला.

उद्घाटनानंतर उपस्थितांनी इमारतीतील विविध सुविधांची पाहणी केली. प्रशस्त कार्यालयीन व्यवस्था, नागरिकांसाठी उपलब्ध करण्यात आलेल्या सुविधा आणि आधुनिक पायाभूत रचनेचे उपस्थितांनी स्वागत केले. या नवीन इमारतीमुळे भुसावळ व परिसरातील नागरिकांना अधिक दर्जेदार, सुलभ आणि वेळेत शासकीय सेवा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.भुसावळ येथील तहसील कार्यालय परिसरात उभारण्यात आलेल्या सह-दुय्यम निबंधक कार्यालयाच्या नव्या प्रशस्त व सुसज्ज इमारतीचे लोकार्पण राज्याचे वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांच्या हस्ते करण्यात आले तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मंत्री संजय सावकारे यांनी नव्या इमारतीची पाहणी करून उपलब्ध कार्यालयीन सुविधांचा आढावा घेतला. नागरिकांना दस्त नोंदणीसाठी अधिक सुलभ, सुरक्षित आणि कार्यक्षम सेवा देण्यासाठी आधुनिक पायाभूत सुविधा आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. नव्या इमारतीमुळे नागरिकांचा वेळ वाचेल, कार्यालयीन कामकाजात गती येईल.

---

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

# CJP आंदोलनावर शिक्षणमंत्र्यांनी अखेर मौन सोडलं !

## 'नीट' पेपरफुटीवर संसदेत चर्चेस तयार असल्याची घोषणा

जन सम्राट टाईम्स

**नवी दिल्ली । प्रतिनिधी:** दिल्लीतील जंतर-मंतर येथे 'नीट' पेपरफुटी प्रकरणी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी सुरू असलेल्या CJP (कॉक्रोच जनता पार्टी) आंदोलनाने मंगळवारी नवे राजकीय वळण घेतले. दिवसभर विरोधी पक्षांनी केंद्र सरकारवर जोरदार हल्लाबोल केल्यानंतर अखेर केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी रात्री उशिरा मौन सोडत सोशल मीडिया प्लॅटफॉर्म *"एक्स"*वर सविस्तर भूमिका मांडली. सरकार 'नीट' परीक्षेतील गैरप्रकारांवर संसदेत चर्चा करण्यास पूर्णपणे तयार असून विद्यार्थ्यांच्या प्रत्येक रास्त शंकेचे निरसन करण्यासाठी कटिबद्ध



असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. जंतर-मंतरवरील आंदोलनाला काँग्रेससह अनेक विरोधी पक्षांनी पाठिंबा दिला आहे. मंगळवारी लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, प्रियंका गांधी यांच्यासह अनेक नेत्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निवासस्थानाबाहेर धरणे आंदोलन केले. या पार्श्वभूमीवर धर्मेंद्र प्रधान यांनी विरोधकांच्या भूमिकेवर तीव्र टीका केली. आपल्या पोस्टमध्ये धर्मेंद्र प्रधान यांनी म्हटले की, "राहुल गांधी आणि काँग्रेस पक्ष संसदेच्या पावसाळी अधिवेशनात व्यत्यय आणण्यासाठी विद्यार्थ्यांचा राजकीय साधन म्हणून निर्लज्जपणे वापर करत आहेत. पंतप्रधानांच्या निवासस्थानाबाहेर आंदोलन करून त्यांनी नागरिकांची गैरसोय केली आणि सुरक्षेच्या नियमांकडेही दुर्लक्ष केले." यापुढे त्यांनी काँग्रेसवर राजकीय प्रसिद्धीसाठी गोंधळ घालण्याचा आरोप केला. सरकारने 'नीट' परीक्षेच्या मुद्द्यावर संसदेत सविस्तर चर्चेची तयारी दर्शवूनही काँग्रेसने लोकशाही मार्गाऐवजी राजकीय देखावा करण्याला प्राधान्य दिल्याचा दावा त्यांनी केला. विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडवण्यापेक्षा राजकीय लाभ मिळवणे हाच विरोधकांचा उद्देश असल्याचेही त्यांनी नमूद केले. धर्मेंद्र प्रधान यांनी आपल्या प्रतिक्रियेत सरकारची भूमिका स्पष्ट करत म्हटले की, "नीट परीक्षेबाबत संसदेत चर्चा करण्यास आमचे सरकार पूर्णपणे तयार आहे. तरुणांच्या प्रत्येक रास्त प्रश्नाचे उत्तर सभागृहात दिले जाईल. भारतीय विद्यार्थ्यांना घोषणाबाजी नव्हे, तर ठोस उपायांची गरज आहे.

### सरकार कोणती ठोस भूमिका घेणार

गोंधळाऐवजी निश्चितता, संघर्षाऐवजी जबाबदारी आणि राजकीय वापराऐवजी न्याय मिळाला पाहिजे." दरम्यान, CJPच्या आंदोलनाला देशभरातून विद्यार्थी, युवक आणि विविध सामाजिक संघटनांचा वाढता पाठिंबा मिळत आहे. विरोधी पक्षांनीही या आंदोलनाला खुले समर्थन दिल्याने हा मुद्दा आता संसदेच्या पावसाळी अधिवेशनातील प्रमुख राजकीय विषय ठरला आहे. विद्यार्थ्यांवरील कथित लाठीमार, 'नीट' परीक्षेतील अनियमितता आणि केंद्रीय शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी यावरून सत्ताधारी आणि विरोधक आमनेसामने आले आहेत. शिक्षणमंत्र्यांच्या या प्रतिक्रियेनंतर आता संसदेत 'नीट' पेपरफुटी प्रकरणावर सविस्तर चर्चा होणार का आणि आंदोलनकर्त्यांच्या मागण्यांबाबत सरकार कोणती ठोस भूमिका घेणार, याकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे.

# नशिराबाद पोलिसांची वेश्याव्यवसायावर धडक कारवाई; दोघांना अटक, दोन पीडित महिलांची सुटका

## अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा

जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी :** नशिराबाद पोलीस ठाण्याच्या हद्दीत सुरू असलेल्या कथित वेश्याव्यवसायावर पोलिसांनी मंगळवारी (दि. २१) धडक कारवाई करत दोन जणांना अटक केली. या कारवाईत दोन पीडित महिलांची सुटका करण्यात आली असून, सुमारे ९१ हजार ६० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नशिराबाद ते सुनसगाव मार्गावरील एका शेतात वेश्याव्यवसाय सुरू असल्याची गोपनीय माहिती सहायक पोलीस निरीक्षक योगिता नारखेडे यांना मिळाली होती.



त्यानंतर खाजगी पंटरमार्फत माहितीची खात्री करून दुपारी सुमारे २.२० वाजता संबंधित ठिकाणी छापा टाकण्यात आला. या कारवाईत प्रदीप जनार्दन रोटे (वय ५७) आणि कैलास संजय भोई (दोघेही रा. नशिराबाद) यांच्या माध्यमातून कुंटणखाना चालविला जात असल्याचे पोलिसांच्या तपासात निष्पन्न झाले. दोघांना तात्काळ अटक करण्यात आली. कारवाईदरम्यान दोन पीडित महिलांची सुटका करण्यात आली असून, घटनास्थळावरून गुन्ह्याशी संबंधित ₹९१,०६० किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी नशिराबाद पोलीस ठाण्यात अनैतिक मानवी व्यापार (प्रतिबंध) अधिनियम अंतर्गत कलम ३, ४, ५ व ७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक योगिता नारखेडे करीत आहेत.ही कारवाई पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक संदीप गावित आणि भुसावळ विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी केदार बारबोले यांच्या मार्गदर्शनाखाली नशिराबाद पोलीस पथकाने केली.

# नंदुरबारमध्ये 'अमृतपेठ थेट बाजारपेठे'चे उद्घाटन




जन सम्राट टाईम्स

**नंदुरबार | प्रतिनिधी:** स्थानिक उद्योजक आणि महिला बचत गटांच्या उत्पादनांना हक्काची बाजारपेठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत – AMRUT) अंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या पहिल्या *"अमृतपेठ थेट बाजारपेठे"*चा उद्घाटन सोहळा सोमवारी (दि. २० जुलै) नंदुरबार येथे उत्साहात पार पडला. या बाजारपेठेचे उद्घाटन धर्म जागरण जिल्हा प्रचारक प्रमुख संजयजी वालतुरे, नागनाथ जोशी, अमृत सखी दीपाली राजपूत आणि ब्राह्मण पंच अध्यक्ष पंकज पाठक यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी स्थानिक उद्योजक, महिला बचत गटांच्या प्रतिनिधींसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. 'अमृत' प्रबोधिनीच्या या उपक्रमामुळे स्थानिक स्तरावरील लघुउद्योजक, महिला बचत गट आणि स्वयंरोजगार करणाऱ्यांना मध्यस्थांशिवाय थेट ग्राहकांपर्यंत पोहोचण्याची संधी उपलब्ध झाली आहे. त्यामुळे उत्पादकांना त्यांच्या वस्तूंना योग्य बाजारभाव मिळण्यास मदत होणार असून ग्राहकांनाही दर्जेदार उत्पादने थेट उत्पादकांकडून उपलब्ध होणार आहेत. 'अमृतपेठ थेट बाजारपेठ' हा उपक्रम स्थानिक उत्पादनांना प्रोत्साहन देण्याबरोबरच ग्रामीण उद्योजकता, महिला सक्षमीकरण आणि स्वावलंबनाला चालना देणारा महत्त्वाचा टप्पा ठरणार असल्याची भावना उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज ज

# धरणगाव तालुक्यात पावसाचा दमदार कमबॅक

## खरीप पिकांना मिळाले जीवदान



जन सम्राट टाईम्स

**भवरखेडे | प्रतिनिधी :** जळगाव जिल्ह्यातील धरणगाव तालुक्यात २० जुलैपासून पावसाने जोरदार पुनरागमन केले असून, काही दिवसांपासून पावसाअभावी चिंतेत असलेल्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. गेल्या काही दिवसांपासून उष्ण व कोरड्या वातावरणामुळे खरीप पिके सुकण्याच्या मार्गावर होती. मात्र, दमदार पावसामुळे शेतकऱ्यांच्या आशा पुन्हा पल्लवित झाल्या आहेत. तालुक्यातील विविध भागांत सोमवारी मुसळधार ते मध्यम स्वरूपाचा पाऊस झाला. या पावसामुळे शेतांमध्ये पाणी साचले असून, सोयाबीन, कापूस, मका आदी खरीप पिकांना नवसंजीवनी मिळाली आहे.

पिके पुन्हा जोमाने वाढू लागल्याने शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधान आणि आनंद दिसून येत आहे. याशिवाय, या पावसामुळे विहिरी आणि बोअरवेलमधील पाण्याच्या पातळीतही वाढ होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

शेतीसह पिण्याच्या पाण्याच्याही दृष्टीने हा पाऊस महत्त्वाचा ठरणार असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. पावसाच्या या दमदार कमबॅकमुळे धरणगाव तालुक्यातील बळीराजाने सुटकेचा श्वास सोडला असून, आगामी काळातही अशाच समाधानकारक पावसाची अपेक्षा शेतकरी व्यक्त करत आहेत. जळगाव जिल्ह्यातील धरणगाव तालुक्यात २० जुलैपासून पावसाने जोरदार पुनरागमन केले असून, काही दिवसांपासून पावसाअभावी चिंतेत असलेल्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

गेल्या काही दिवसांपासून उष्ण व कोरड्या वातावरणामुळे खरीप पिके सुकण्याच्या मार्गावर होती. मात्र, दमदार पावसामुळे शेतकऱ्यांच्या आशा पुन्हा पल्लवित झाल्या आहेत. तालुक्यातील विविध भागांत सोमवारी मुसळधार ते मध्यम स्वरूपाचा पाऊस झाला. या पावसामुळे शेतांमध्ये पाणी साचले असून, सोयाबीन, कापूस, मका आदी खरीप पिकांना नवसंजीवनी मिळाली आहे. पिके पुन्हा जोमाने वाढू लागल्याने शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधान आणि आनंद दिसून येत आहे.

# वैजाली येथे 'आत्मा' अंतर्गत नैसर्गिक शेती शाळा उत्साहात संपन्न

## शासकीय योजनांबाबत शेतकऱ्यांना सखोल मार्गदर्शन




जन सम्राट टाईम्स

**शहादा | प्रतिनिधी :** कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) अंतर्गत मौजे वैजाली येथे प्रकल्प संचालक आत्मा दीपक पटेल यांच्या मार्गदर्शनाखाली नैसर्गिक शेती शाळेचा दुसरा वर्ग उत्साहात संपन्न झाला. या शेती शाळेत नैसर्गिक शेतीचा प्रसार, शाश्वत पीक उत्पादन आणि खर्चात बचत करण्यासाठी आवश्यक तांत्रिक बाबींवर शेतकऱ्यांना सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमास मंडळ कृषी अधिकारी एस. बी. बागुल तसेच कृषी विज्ञान केंद्र, कोळदा येथील विषय विशेषज्ञ पद्माकर कुंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक रवींद्र बच्छाव यांनी मागील वर्गाचा आढावा घेत नैसर्गिक शेती शाळेची उद्दिष्टे आणि महत्त्व स्पष्ट केले. यावेळी मंडळ कृषी अधिकारी एस. बी. बागुल यांनी नैसर्गिक शेतीची संकल्पना, उद्दिष्टे तसेच कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध शासकीय योजनांची माहिती देत शेतकऱ्यांनी त्यांचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले. कृषी विज्ञान केंद्राचे विषय विशेषज्ञ पद्माकर कुंदे यांनी कापूस पिकातील अंतरमशागत, पाणी व्यवस्थापन, एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन तसेच 'दादा लाड तंत्रज्ञान' अंतर्गत फांद्यांचे व फळधारणेचे वैज्ञानिक व्यवस्थापन याबाबत प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन केले. त्यांनी शेतकऱ्यांच्या विविध शंकांचे निरसन करत उत्पादनवाढीसाठी आवश्यक तांत्रिक उपायही सांगितले. शेती शाळेनंतर प्रात्यक्षिक प्लॉटला प्रत्यक्ष भेट देऊन पिकांची वाढ, व्यवस्थापन आणि तांत्रिक बाबींचे निरीक्षण करण्यात आले. शेतावरच मार्गदर्शन झाल्यामुळे कार्यक्रम अधिक उपयुक्त ठरल्याची भावना शेतकऱ्यांनी व्यक्त केली. या कार्यक्रमास अन्नदाता शेतकरी गटाचे सदस्य, ह.भ.प. भजनी मंडळाचे सदस्य तसेच गावातील मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते. उपस्थितांनी नैसर्गिक शेतीच्या तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याचा निर्धार व्यक्त केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहाय्यक कृषी अधिकारी योगेश मिस्त्री यांनी केले, तर तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक रवींद्र बच्छाव यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# राष्ट्रीय मुस्लिम मोर्चाचे जळगाव जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे

## धार्मिक स्वातंत्र्य, मॉब लिंचिंगसह विविध मुद्द्यांवर निवेदन



जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी:** भारत मुक्ती मोर्चा आणि राष्ट्रीय मुस्लिम मोर्चाच्या वतीने जळगाव जिल्हाधिकारी कार्यालयासमोर विविध मागण्यांसाठी धरणे आंदोलन करण्यात आले. आंदोलनाचे नेतृत्व भारत मुक्ती मोर्चाचे जिल्हाध्यक्ष देवानंद निकम आणि राष्ट्रीय मुस्लिम मोर्चाचे राज्य उपाध्यक्ष डॉ. शाकीर शेख यांनी केले. देशातील मुस्लीम समाजावरील कथित मॉब लिंचिंगच्या घटना, धार्मिक स्थळांवरील हल्ले, धार्मिक अल्पसंख्याकांच्या सुरक्षेचे प्रश्न, संविधानिक अधिकारांचे संरक्षण, सामाजिक न्याय आणि धार्मिक स्वातंत्र्य यासह एकूण १२ मागण्यांसाठी हे आंदोलन करण्यात आले. आंदोलनादरम्यान आंदोलकांनी वक्फ (सुधारणा) अधिनियम २०२६ रद्द करणे, संविधानातील कलम २५ ते २९ अंतर्गत धार्मिक स्वातंत्र्याचे संरक्षण, मॉब लिंचिंग रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना, बेकसूर मुस्लिम तरुण व उलेमांची सुटका, कम्युनल व्हायोलन्स प्रिव्हेन्शन कायदा लागू करणे, धार्मिक स्थळांवरील हल्ले रोखणे, जातीआधारित जनगणना, प्लेसेस ऑफ वर्शिप कायदा १९९१ ची प्रभावी अंमलबजावणी आदी मागण्या मांडल्या. शिष्टमंडळाने अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर करून केंद्र सरकारकडे या मागण्यांचा सकारात्मक विचार करण्याची विनंती केली. यावेळी बहुजन मुक्ती पार्टीचे राज्य प्रभारी सुमित्र अहिरे, अ. करीम सालार, नियाज अली फाऊंडेशनचे अय्याज अली, फैजपूरचे माजी नगराध्यक्ष मुबारक भाई, माजी नगरसेवक रियाज बागवान, खालिद बागवान, सावरकर रिक्षा युनियनचे अध्यक्ष दिलीप सपकाळे, बहुजन मुक्ती पार्टीचे रविंद्र मोरे, खुशाल सोनवणे, रविंद्र बाविस्कर, राष्ट्रीय मुस्लिम मोर्चाचे हाफिज फिरोज, गनी शाह, अकील कासार, मुफ्ती खालिद, रफिक शेख, इरफान शेख, जमील शेख, सै. कलीम रिजवान शेख, पीस पार्टीचे आरिफ देशमुख, भारत मुक्ती मोर्चाचे जाकीर कुरेशी, दिलीप जाधव, डी. एम. भालेराव, मनोहर लोखंडे, त्र्यंबक सोनवणे, रमेश थाटे, दिलीप इंगळे, बुद्धिस्ट इंटरनॅशनल नेटवर्कचे चंद्रशेखर अहिरराव, दिनेश सपकाळे, सुनील सपकाळे, प्रा. किसन हेरोळे, शैलेश नन्नवरे, राष्ट्रीय मूलनिवासी पेन्शनर संघाचे मनोहर कोचुरे, सुनील सोनवणे, दिलीप तासखेडकर, संतोष साळवे, तबन ह्याळिंगे यांच्यासह विविध सामाजिक संघटनांचे शेकडो पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा : मार्शल किशोर डोंगरे

जन सम्राट टाईम्स

**पाचोरा। प्रतिनिधी:** सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांच्या समर्थनार्थ समता सैनिक दलाच्या वतीने सोमवारी (दि. २०) पाचोरा येथील प्रांताधिकारी कार्यालयामार्फत राष्ट्रपती आणि पंतप्रधान कार्यालयाला निवेदन देण्यात आले. यावेळी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा, अशी मागणी करण्यात आली. आंदोलनादरम्यान कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी करत आपला निषेध व्यक्त केला. यावेळी समता सैनिक दलाचे जिल्हाध्यक्ष मार्शल किशोर डोंगरे यांनी पत्रकारांशी संवाद साधताना जंतर-मंतर, नवी दिल्ली येथे आंदोलन करणाऱ्या आंदोलकांवर पोलिसांनी केलेल्या कथित लाठीचार्जाचा निषेध व्यक्त केला. लोकशाहीत शांततामय मार्गाने आपले मत मांडण्याचा अधिकार हा नागरिकांचा घटनात्मक हक्क असल्याचे सांगत त्यांनी आंदोलनकर्त्यांशी संवाद साधण्याऐवजी दडपशाहीचा मार्ग स्वीकारणे लोकशाहीसाठी घातक असल्याचे मत व्यक्त केले. शासनाने शांततापूर्ण आंदोलनांकडे कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न म्हणून न पाहता जनतेचा आवाज म्हणून स्वीकारावे आणि आंदोलनकर्त्यांशी तातडीने संवाद साधून त्यांच्या मागण्यांवर तोडगा काढावा, अशी मागणीही त्यांनी केली. या वेळी अरुण खरे, अभिमान बाविस्कर, सुकलाल पवार, अलकाताई मोरे, शशीकांत मोरे, पाचोरा तालुका अध्यक्ष पिटू सावळे, अजय संसारे, दशरथ तांबे, शहराध्यक्ष प्रवीण वाघ तसेच जिल्हा व तालुक्यातील पदाधिकारी उपस्थित होते.

# खेडी खुर्दमध्ये गावांतर्गत काँक्रीट रस्त्याचे भूमिपूजन!

## धूळ व चिखलाच्या त्रासातून ग्रामस्थांना दिलासा



जन सम्राट टाईम्स

**एरंडोल| प्रतिनिधी :** एरंडोल तालुक्यातील खेडी खुर्द गावातील अंतर्गत काँक्रीट रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन नुकतेच मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाले. या विकासकामामुळे ग्रामस्थांची अनेक वर्षांपासूनची मागणी पूर्ण होत असून, पावसाळ्यातील चिखल आणि उन्हाळ्यात उडणाऱ्या धुळीच्या त्रासातून नागरिकांची सुटका होणार आहे.गावातील अंतर्गत रस्त्यांचे काँक्रीटीकरण झाल्यानंतर नागरिक, शालेय विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक तसेच वाहनधारकांना सुरक्षित आणि सुकर प्रवास करता येणार आहे. तसेच परिसर स्वच्छ राहण्यास मदत होऊन गावाच्या विकासाला चालना मिळणार असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली. भूमिपूजन कार्यक्रमाला ग्रामपंचायत प्रशासक सुरेश सोनवणे, पंचायत समितीचे माजी सभापती मोहनभाऊ सोनवणे, नारायण सोनवणे, पन्नालाल सोनवणे, हिरालाल सोनवणे, सतीश सोनवणे, दगडू सोनवणे, साहेबराव कोळी, सोमा कोळी, किशोर सोनवणे, जनार्दन कोळी, ग्रामपंचायत अधिकारी योगेश चंदनकर, बांधकाम ठेकेदार सुधाकर कोळी, ग्रामपंचायत लिपिक भाईदास कोळी तसेच मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी उपस्थितांनी रस्त्याचे काम दर्जेदार पद्धतीने आणि निश्चित कालावधीत पूर्ण करण्याची अपेक्षा व्यक्त केली.

### विकासाला चालना

गावातील अंतर्गत रस्त्यांचे काँक्रीटीकरण झाल्यानंतर नागरिक, शालेय विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक तसेच वाहनधारकांना सुरक्षित आणि सुकर प्रवास करता येणार आहे. तसेच परिसर स्वच्छ राहण्यास मदत होऊन गावाच्या विकासाला चालना मिळणार असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

# पाळधी येथे सायबर सुरक्षा जनजागृती अभियानास उत्स्फूर्त प्रतिसाद

## ऑनलाइन फसवणूक, फिशिंग व डिजिटल सुरक्षिततेबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

जन सम्राट टाईम्स

**पाळधी (ता. धरणगाव) | प्रतिनिधी :** भाऊसाहेब गुलाबरावजी पाटील विद्यालय, पाळधी येथे इयत्ता ५ वी ते १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षा जनजागृती विषयावर विशेष मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले. डिजिटल युगात वाढत्या सायबर गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षिततेबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. विद्यालयाचे मुख्याध्यापक मा. कणखरे सर यांच्या



मार्गदर्शनाखाली झालेल्या या सत्रात कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथील विद्यार्थिनी साक्षी पाटील आणि विद्या सोनवणे यांनी Quick Heal Foundation च्या Cyber Warrior उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी ऑनलाइन फसवणूक, फिशिंग, ओटीपी आणि पासवर्ड सुरक्षितता, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर तसेच सायबर गुन्ह्यांपासून बचावासाठी घ्यावयाची काळजी याबाबत विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती देण्यात आली. संवादात्मक पद्धतीने पार पडलेल्या या सत्राला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. विद्यार्थ्यांनी विविध प्रश्न विचारून सायबर सुरक्षेबाबतच्या शंकांचे निरसन करून घेतले. कार्यक्रमाच्या शेवटी मुख्याध्यापक मा. कणखरे सर यांनी मार्गदर्शकांचे आभार मानले आणि विद्यार्थ्यांनी डिजिटल माध्यमांचा जबाबदारीने व सुरक्षितपणे वापर करण्याचे आवाहन केले. हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त आणि प्रेरणादायी ठरलानशिराबाद पोलिसांची वेश्याव्यवसायावर धडक कारवाईनशिराबाद पोलिसांची वेश्याव्यवसायावर

### विद्यार्थ्यांना देण्यात आली माहिती

ऑनलाइन फसवणूक, फिशिंग, ओटीपी आणि पासवर्ड सुरक्षितता, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर तसेच सायबर गुन्ह्यांपासून बचावासाठी घ्यावयाची काळजी याबाबत विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती देण्यात आली. संवादात्मक पद्धतीने पार पडलेल्या या सत्राला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. विद्यार्थ्यांनी विविध प्रश्न विचारून सायबर सुरक्षेबाबतच्या शंकांचे निरसन करून घेतले.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306